# यावल महाविद्यालयात करिअर कट्ट्याचे उद्घाटन

यावल( प्रतिनिधी )येथील जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक संचलित कला ,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात करियर कट्टा चे उद्घाटन भालोद महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. डी .ए .खोब्रागडे यांनी ऑनलाइन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान  उपप्राचार्य प्रा .एम. डी. खैरनार यांनी भषविले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा. ए .पी. पाटील यांनी केले. डॉ. खोब्रागडे यांनी करियर कट्टा चे ऑनलाईन उद्घाटन करून *स्पर्धा परीक्षेची तयारी* या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी प्रतिपादन केले की स्पर्धा परीक्षेत करिअर करायचे हे निश्चित केल्यानंतर अभ्यासाचे नियोजन करणे खूप गरजेचे असते. एका विषयाचे पूर्ण आकलन झाल्यानंतरच दुसऱ्या विषयाकडे वळावे.इयर बुक ,मासिक यातून वर्षभरातील विविध घडामोडींचे ज्ञान होते .स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी श्रवण ,वाचन, मनन, चिंतन वआकलन या सर्व गोष्टींची गरज असते .त्यांनी पोलीस भरती, आर आर बी ,स्टाफ सिलेक्शन ,बॅकींग व एमपीएससी या  स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करायची याची सविस्तर माहिती दिली .उपप्राचार्य प्रा .एम.डी. खैरनार यांनी मार्गदर्शन केले की करिअर निवडताना आपली आवड व क्षमता याचा विचार करावा. करिअर करताना व्यक्तिमत्व विकास कसा होईल याला देखील प्राधान्य देणे गरजेचे आहे. डॉ. संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुधा खराटे यांनी केले तर आभार करियर कट्ट्याचे समन्वयक डॉ. एस. पी  .कापडे यांनी मानले .कार्यक्रमास एकूण 62 विद्यार्थी हजर होते. या कार्यक्रमास डॉ. पी .व्ही. पावरा,प्रा. एस.आर .गायकवाड ,डॉ. एच. जी. भंगाळे यांनी सहकार्य केले.





पुण्य नगरी

# यावल महाविद्यालयात करिअर कट्ट्याचे उद्‌घाटन

यावलः येथील जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक संचलित कला ,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात करियर कट्टा चे उद्घाटन भालोद महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. डी .ए .खोब्रागडे यांनी ऑनलाइन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान उपप्राचार्य प्रा .एम. डी. खैरनार यांनी भुषविले.

प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा. ए .पी. पाटील यांनी केले. डॉ. खोब्रागडे यांनी करियर कट्टाचे ऑनलाईन उद्घाटन करून स्पर्धा परीक्षेची तयारी या विषयावर मार्गदर्शन केले.स्पर्धा परीक्षेत करिअर करायचे हे निश्चित केल्यानंतर अभ्यासाचे नियोजन करणे खूप गरजेचे असते. एका विषयाचे पूर्ण आकलन झाल्यानंतरच दुसऱ्या विषयाकडे वळावे.इयर बुक ,मासिक यातून वर्षभरातील विविध घडामोडींचे ज्ञान होते .स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी श्रवण ,वाचन, मनन, चिंतन वआकलन या सर्व गोष्टींची गरज असते असे मत त्यांनी व्यक्त केले.

त्यांनी पोलीस भरती, आर आर बी ,स्टाफ सिलेक्शन ,बॅकींग व एमपीएससी या स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करायची याची सविस्तर माहिती दिली .उपप्राचार्य प्रा .एम. डी. खैरनार यांनी मार्गदर्शन केले की करिअर निवडताना आपली आवड व क्षमता याचा विचार करावा. करिअर करताना व्यक्तिमत्व विकास कसा होईल याला देखील प्राधान्य देणे गरजेचे आहे. डॉ. संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला.

सूत्रसंचालन डॉ. सुधा खराटे यांनी केले तर आभार करियर कट्टयाचे समन्वयक डॉ. एस. पी .कापडे यांनी मानले .कार्यक्रमास एकूण ६२ विद्यार्थी हजर होते. या कार्यक्रमास डॉ. पी .व्ही. पावरा,प्रा. एस. आर .गायकवाड ,डॉ. एच. जी. भंगाळे यांनी सहकार्य केले.

Jalgaon Edition
Page No.4 November 29, 2021